# तस्मै श्रीगुरवे नमः

श्री.विजयकुमार पाईकराव, नाशिक. संपर्क - ९४०३७७४५२९

शिक्षक दिनी, गुरूचे स्मरण ही आदराने आणि विश्वासाने शिक्षकांप्रती आपल्या भावना व्यक्त करण्याची परंपरा आहे. अभ्यासाने, ज्ञानाने, अनुभवाने स्वतःला समृद्ध करणारा विचार, आचार व दिशा आपल्या वर्तनातून दिसावयास हवी. यासाठी स्वंयमूल्यमापन, स्वयंअध्ययनाची कास धरावयास हवी, गुरूजी, मास्तर, सर, मार्गदर्शक, समंत्रक, गाईड, प्राध्यापक, तत्त्ववेता, मार्गदाता, जिवलग मार्गदर्शक, मित्र, जीवनाचा शिल्पकार, मूर्तिकार अशा अनेक नावांनी शिक्षकांचा गौरव आपण करतो. यामध्ये कर्तव्याशी बांधिलकी हा महत्त्वाचा धागा आहे. याविषयी विमर्शी चिंतन.

'दिसामाजी काहीतरी ते लिहावे! प्रसंगी अखंडित वाचित जावे.'

हे समर्थांचे सांगणे प्रत्यक्ष कार्यानंदात उतरवणारा खरा शिक्षक होय. शिकणे सोपे असले तरी शिकवणे तितकेच अवघड आहे. विद्यार्थ्यांना शिकवताना आपले संपूर्ण कसब पणाला लावतो तो खरा शिक्षक. पालक आपल्या कर्तव्याला चुकले तर, एक दोन मुल बिघडतात. पण जर शिक्षक आपल्या कर्तव्याला चुकले तर अख्खी पिढी बिघडते ही वास्तविकता आहे. शिक्षक विश्वाच्या विकासातील महत्त्वाचा सूत्रधार होय.

**'मी एक शिक्षक आहे'**.विद्यार्थ्यांवर निखळ आणि निरंतर प्रेम करणे हे माझे कर्तव्य आहे.विद्यार्थ्यांतील सुप्त कला आणि कौशल्य विकसित करणे हा माझा छंद आहे. विद्यार्थ्यांची गरज ओळखणे, हे माझे उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्यांत मानवतावाद रूजविणे, हा धर्म आहे.विद्यार्थ्याला मानव आणि प्राणी यातील फरक शिकविणे हा माझा सांस्कृतिक कार्यानंद आहे.विद्यार्थ्यांत निसर्गप्रेम जागृत करणे हे माझ्या शाश्वत आनंदाचे स्वरूप आहे.विद्यार्थ्यांना सत्य शोधायला शिकवणे ही माझी विज्ञानवादी दिशा आहे.विद्यार्थ्याला सत्याप्रत घेऊन जाणे ही माझी प्रवृत्ती आहे.विद्यार्थ्याला नवनवीन ज्ञान देणे हे माझ्या जिवंतपणाचे लक्षण आहे.विद्यार्थ्याला जे जे शिकवले ते ते कृतीत उतरवणे हेच माझे शील आहे.विद्यार्थ्यांचे आत्मभान जागवणे आणि त्यांना भयमुक्त करणे हे माझे कर्म होय.असा शिक्षक एक जप असतो.शिक्षक एक तप असतो. शिक्षक एक व्रत असतो. अन् हे तो आयुष्यभर जपत असतो.शिक्षक असतो अपंगाचं मन निर्धनाच धन.शिक्षक असतो मुक्याची वाचा अन् आंधळ्याची दृष्टी.शिक्षक एक आचार असतो, तो एक विचार असतो. जो कधीच लाचार नसतो.शिक्षक सागर असतो ज्ञानाचा, अन सुसंस्काराचा.शिक्षक एक युगातील धागा, अन् देव्हाऱ्यातील जागा. शिक्षक असतो एका माणसाचं सैन्य, आयुष्यभर वर्गातल्या वर्गात अज्ञानाशी लढाई करणारे.शिक्षक जळणाऱ्या ज्योतीचं ज्वलन असतो.

**शिक्षक असतो :-**

- कर्तव्यदक्ष अन् कार्यक्षम, प्रेरणादायी.
- विद्यार्थ्यांविषयी लळा, जिव्हाळा, आपुलकी बाळगणारा.अक्षरांना बळ देणारा, शिस्तप्रिय.
- प्रसंगी कठोर अन् उरात जिव्हाळा जपणारा.
- शिकविण्याचे सहज, सुलभ कौशल्य असणारा.
- आशय सोपा करणारा - विषयतज्ज्ञ.

- ज्ञानकण सतत वेचणारा अन् विद्यार्थ्यातील राजहंस शोधणारा.
- आपल्या अनुभवांची शिदोरी देणारा.
- विद्यार्थ्यांत जीवनमूल्यांची रूजवा करणारा.
- विद्यार्थ्यांच्या आयुष्याची वाट सुखकर करणारा.
- आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहून विद्यार्थी हितात इतिकर्तव्यता मानणारा.
- प्रयोगशील अन् नवोपक्रम कार्यानंदी.

**अशा शिक्षकाला तस्मै श्रीगुरवे नम:**

एखादी गोष्ट एका पद्धतीने जमली नाही तर ती दुसऱ्या पद्धतीने करून पाहणे हे सूज्ञाचे लक्षण. एखादी गोष्ट माहिती नसेल तर ती माहिती करून घेणे. माहिती असलेली समस्या सोडविण्यासाठी वापरणे व शक्य झाल्यास त्यात भर घालणे हा शिक्षकांचा कार्यानंद होय.

कल्पकता म्हणजे नवीन किंवा वेगळे तयार करणे. मनातल्या कल्पकतेचे लेखनात, चित्रात, खेळात, संगीतात, नाचात, नाटकात, मूर्तीत, प्रतिकृतीत, ज्ञान-विज्ञानात रूपांतर करण्यासाठीचा प्रेरणास्रोत हा शिक्षक असतो. अशा गुरूला नमस्कार!

जीवनातल्या या नित्यक्रमाचे जेव्हा उत्सव होतात तेव्हा आयुष्य आनंदमयी होते. त्यासाठी हवे अखंड वाचन, लेखन, विमर्शी चिंतन. त्यातूनच व्हावे ज्ञानाचे अध्ययन-अध्यापन, ज्ञानाचा विस्तार, ज्ञानाची निर्मिती (संशोधन) अन् ज्ञानाचे मूल्यमापन. हे पंचकार्य करणाऱ्या शिक्षकांसाठी आचारसंहितेच्या बागुलबुवाची गरजच राहणार नाही. एखादे चुकीचे लेखन, वाचन, भाषण झाले की, त्यात सुधारणा करण्यास कमीपणा वाटू नये परंतु असे होत नाही. ही चिंतेची आणि चिंतनाची बाब आहे. ती आमच्यासाठी बौद्धिक दिवाळखोरी ठरेल. प्रज्ञा, शील, करुणा, मैत्री, साधना, समाधी इत्यादी सद्वर्तनाचे वातावरण निर्माण करण्याचा कार्यानंद शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठातील शिक्षकांनी स्वत:पासून करावा. शिक्षक अहंकाराने पीडित होत आहेत. मी म्हणतो तेच खरे, माझ्यासारखे विद्वान कुणी नाही. अशा तोऱ्यात जगणारा अध्यापक वर्ग सभा-संमेलनात बेगडी धन्यता जोपासतो आहे त्याला पूर्णविराम द्यावयास हवा.

ज्याला या हृदयीचे त्या हृदयी देतो तोच खरा शिक्षक. घडा आणि घडवा हे त्यांचे तंत्र व मंत्र. विद्यार्थ्यांचा विश्वास ही शक्ती. आपल्या सर्वात समान गुणवत्ता नाही पण सगळ्यांना गुणवत्ता विकसित करण्याची समान संधी मात्र हवी, त्यासाठीच मार्गक्रमण. शिक्षकांची विविध रूपे ही यानिमित्त उन्नयित झाली पाहिजेत,

‘तुम्ही हो माता, पिता तुम्ही हो.
तुम्ही हो बंधु, सखा तुम्ही हो!!’

 ISSN 2231-6493 ऑक्टोबर २०१५ भाद्रपद / आश्विन - शके १९३७